# ऋणनिर्देश

**"श्री संत गाडगे महाराज मिशनचे कार्य (इ.स.१९५२ ते २००२)-एक अभ्यास"** या विषयावरील माझ्या एम.फिल. पदवीसाठी लिहलेला लघु-शोधप्रबंध अनेकांच्या प्रेरणा, मार्गदर्शन आणि सहकार्य यामुळे मला पूर्ण करता आला. यासाठी मला अनेकांचे बहुमोल सहकार्य आणि मदत मिळाली. त्या सर्वांचे योग्य ते ऋणनिर्देशन करणे आणि त्यांच्याबद्दल आदर बाळगणे हे मी माझे परम कर्तव्य समजतो.

प्रथमत: या संशोधनाच्या कामात शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागातील प्राध्यापक, माझे प्रेरणास्थान आदरणीय गुरूवर्य **प्रा.डॉ.अरूण भोसले** यांनी मला बहुमोल मार्गदर्शन केले. त्यांचा विषयाचा व्यासंग, संशोधनातील शिस्त, प्रदीर्घ अनुभव आणि अखंड उत्साह मला सतत प्रेरणादायी ठरला. त्यांच्या अचूक व प्रेमळ मार्गदर्शनामुळेच मला हे संशोधनाचे कार्य पूर्ण करता आले. याबद्दल प्रा.डॉ.अरूण भोसले यांचे आभार मानण्यापेक्षा आयुष्यभर त्यांच्या ऋणात राहणे मी पसंत करतो.

हा लघु-शोधप्रबंध पूर्ण करत असताना इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ.एम.ए.लोहार, डॉ.एम.पी.पाटील, डॉ.सौ.नंदा पारेकर, डॉ.सौ.पद्मजा पाटील, डॉ.कविता गगराणी, डॉ.अवनीश पाटील या गुरूवर्यांचे व लेखनिक उदय खेडकर सर यांचे मला नेहमीच प्रोत्साहन व सहृदयतेने केलेले सहकार्य लाभले त्याबद्दल या सर्वांचा मी आभारी आहे.तसेच मी ज्या महाविद्यालयात शिक्षण घेतले त्या रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी महाविद्यालय, दहिवडी (ता.माण) येथील इतिहासाचे माझे गुरू प्रा.विनायक जाधव, प्रा.सौ. उज्वला नलवडे यांचेकडून संशोधन कार्यास स्फूर्ती मिळाली त्याबद्दल मी नम्रतापूर्वक त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

या लघु-शोधप्रबंधासाठी श्री गाडगे महाराज मिशनचे कार्यकारी अध्यक्ष यशवंतराव मानेबाबा, सचिव तुकाराम खांडवे आण्णा, संचालक शिवाजीराव महानवर, ब्रम्हपुरी आश्रमशाळेचे संचालक मधुसुदन मोहिते व सौ.मोहिते मॅडम, श्री गाडगे महाराज मिशन



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

संचलित शाखांचे मुख्याध्यापक व शिक्षक श्री.धुळदेव लोखंडे सर, तांबे सर, श्री.लक्ष्मण महानवर सर, श्री. नंदकुमार भिसे सर, सौ.सुरेखा महानवर मॅडम, तात्याबा तांबे सर, श्री.नानासाहेब गमे सर, श्री. यशवंत गोफणे सर, श्री.बाळासाहेब बरकडे सर, यांनी मला माझ्या संशोधनासाठी उपयुक्त अशी माहिती, संदर्भग्रंथ, वार्षिक अहवाल, त्रैमासिके, विशेषांक इत्यादी अगत्यपूर्वक उपलब्ध करून दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी जरी मी कष्ट घेतले असले तरी ज्यांच्या कष्टाने व अर्थ सहाय्याने शिकण्याची स्फूर्ती मिळाली ते माझे आई-वडील, पितृतूल्य चुलते प्रा. तुळशीराम महानवर, प्रा.सौ.सुनंदा महानवर, वडील बंधू विठ्ठल महानवर, वहिनी सौ.रेश्मा महानवर, भाची कविता, भाचे भरत, योगेश, किरण, अमर तसेच चुलत बंधू मारूती, शहाजी, दत्तू, विजय, कुणाल, अभिषेक, विशाल, निलेश, किरण यांचे अशिर्वाद हीच माझ्या शब्द सामर्थ्याची अक्षय शिदोरी आहे. ते सर्वजण माझ्या यशाचे मानकरी आहेत. तसेच हा लघु-शोधप्रबंध पूर्ण करणेसाठी माझे नातेवाईक बापूराव बनाजी दडस, चंद्रकांत बनाजी दडस, डॉ.शरद मडके, दत्तात्रय गोफणे, भिवाजी गोफणे, वसंत रूपनवर, राजेंद्र टोंबरे, मातृतुल्य बहिणी सुनंदा रूपनवर, संगिता गोफणे, वैशाली तांबे यांचेकडून सदैव प्रोत्साहन मिळाले.

मला सतत प्रोत्साहन व प्रेमळ सहकार्य देणारे माझे परममित्र **तानाजी हवलदार**, दत्ता डुबल, शिवाजी जाधव, सचिन धेंडे, डॉ.एस.पी.शिंदे, डॉ.खंडू शिंदे, प्रा.वसंत ढेरे, प्रा.सुरेश शिखरे, प्रा.प्रशांत पाटील, प्रा.अजित जाधव, प्रा.मारूती तांबे, पांडुरंग आमले, सिकंदर सिदलाळे, बाबली गावडे, अमर जाधव, अखिलेश शिंदे, प्रमोद सजगणे, सुशांत महाजन, प्रकाश पाटील, अशोक नलवडे काका, श्रीराम मोहिते, रमजान सय्यद, बसवराज पुजारी, संजू नवले, सुमित यादव, एम.फिल.चे सर्व सहकारी व इतिहास विभागातील शिपाई सुनिल कांबळे, सागर खाडे या सर्वांचा मी आभारी आहे. हा लघु-शोधप्रबंध वेळेत टंकलेखन करून देणारे माझे मित्र अविनाश व अरूण कांबळे यांचाही मी आभारी आहे.

**महानवर राजेंद्र पांडुरंग**

**(संशोधक)**

# प्रस्तावना

महाराष्ट्र हे शैक्षणिक व सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने एक प्रगत राज्य आहे. महाराष्ट्रात शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात दैदिप्यमान कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था होत्या व आहेत. म.फुले, छ.राजर्षि शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, कै.यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत मोलाचे कार्य केले आहे. संत गाडगेबाबा याच मालिकेतील होते. त्यांनी अखंड ५० वर्षे कीर्तनाद्वारे समाजामधील अज्ञान, दारिद्रय, आयोग्य चालीरिती, धार्मिक रूढी-परंपरा, व्यसनाधिनता यातून समाजाची मुक्तता करण्यासाठी प्रयत्न केले. या प्रयत्नाला मूर्त स्वरूप देण्यासाठी त्यांनी इ.स.१९५२ मध्ये मुंबई येथे 'श्री गाडगे महाराज मिशन' या सेवाभावी संस्थेची स्थापना केली. गेल्या पाच दशकात गाडगे महाराज मिशनचे कार्यक्षेत्र खूप विस्तारले आहे. आज महाराष्ट्रातील २२ पेक्षा अधिक जिल्हयात व आदिवासी भागात गाडगे महाराज मिशन संचलित धर्मशाळा, आश्रमशाळा, माध्यमिक विद्यालये, केंद्रीय.एस.सी. आश्रमशाळा, पाळणाघरे, कन्या विद्यालये, मुला मुलींची वसतिगृहे, वृद्धाश्रम, अंध-पंगू सदावर्ते, धर्मशाळांचे ट्रस्ट, गोरक्षण संस्था, धर्मादाय दवाखाने, पाणपोई इत्यादी वेगवेगळया स्वरूपाच्या सामाजिक व शैक्षणिक शाखा कार्यरत आहेत.

आजपर्यंत गाडगे महाराज मिशनच्या बहूविध क्षेत्रातील महत्वपूर्ण कार्यावर संशोधन झाले नाही हे मी आदरणीय गुरूवर्य प्रा.डॉ.अरूण भोसले सर यांच्या निदर्शनास आणले. त्यांनी **"श्री संत गाडगे महाराज मिशनचे कार्य ( इ.स.१९५२ ते २००२ ) - एक अभ्यास"** या विषयावर संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यामुळे मी एम.फिल. पदवीसाठीच्या संशोधनासाठी 'श्री गाडगे महाराज मिशनचे कार्य ( इ.स. १९५२ ते २००२) - एक अभ्यास' हा विषय निवडला आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

श्री संत गाडगे महाराज मिशनचे कार्य (इ.स. १९५२ ते २००२) - एक अभ्यास या संशोधन प्रबंधामध्ये मिशनचे संस्थापक, त्यांचे जीवन व कार्य, गाडगे महाराज मिशनची स्थापना, गेल्या ५० वर्षातील मिशनचा सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यविस्तार आणि गाडगे महाराज मिशनची संबंधीत सर्व घटकांचा सखोल अभ्यास केला आहे.

यासाठी प्रामुख्याने ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करून संशोधनात अधिकाधिक वस्तुनिष्ठता आणण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी अनेक मराठी, हिंदी, इंग्रजी संदर्भ साधन ग्रंथ व गाडगे महाराज मिशनच्या संबधीत प्रकाशित, अप्रकाशित कागदपत्रांची मदत घेतलेली आहे. संदर्भसाधन ग्रंथामध्ये **श्री गाडगेबाबा-** के.सी.ठाकरे, **श्री गाडगे महाराज** - गो.नी.दांडेकर, **श्री.गाडगे महाराज स्मारक ग्रंथ** - रा.तु भगत ( संपा.) **निष्काम कर्मयोगी गाडगे महाराज** - रसाळे उद्धव, **लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन आणि कार्य** - प्रा.द.ता.भोसले, **कर्मयोगी संत गाडगेबाबा** - कवडे पा.बा, **माणुसकीचा नंदादीप** - पाटणे संभाजीराव, **श्री गाडगेबाबा विचारधन** - (हिंदी) पाठक सुनंदा ( अनु.), **गाडगेबाबांची पत्रे** - भगत रा.तु.( संपा.), **लोकशिक्षक गाडगेबाबा** - देखणे रामचंद्र, **तोचि साधु ओळखावा** - पाटील प.ह. इत्यादी **मराठी संदर्भ साधन** ग्रंथाचा वापर केला आहे. तसेच **इंग्रजीमधील** The wandering Saint Gadgebaba–Vasant Shirwadkar; Sant Gadgebaba- Bhagat R.T. या पुस्तकांची मदत घेतली आहे त्याचबरोबर गाडगे महाराज मिशनचे वार्षिक अहवाल, त्रैमासिके, सुवर्णमहोत्सव विशेषांक, मिशनची आर्थिक ताळेबंद पत्रके, गाडगे महाराज मिशन प्रकाशन समितीने प्रकाशित केलेली पुस्तके तसेच गाडगे महाराज मिशनचे पदाधिकारी, मिशन संचलित वेगवेगळया शाखेतील सेवकवर्ग यांच्या मुलाखती इत्यादी मौलिक संदर्भ साधनांचा आधार घेतला आहे.

प्रस्तुत लघु-शोधप्रबंध पाच प्रकरणात विभागण्यात आला आहे.

१. श्री गाडगे महाराज मिशनचे संस्थापक: जीवन व कार्य

२. श्री गाडगे महाराज मिशनची स्थापना व कार्यविस्तार

३. श्री गाडगे महाराज मिशनचे प्रशासन

४. श्री गाडगे महाराज मिशनचे नेतृत्व

५. समारोप

**श्री गाडगे महाराज मिशनचे संस्थापक : जीवन व कार्य** या प्रथम प्रकरणामध्ये गाडगेबाबांचा अल्पपरिचय, गाडगेबाबांची शिकवण, संदेश, सामजिक कार्य, कीर्तनातून त्यांनी केलेले समाजप्रबोधन, तसेच स्थापन केलेल्या सामाजिक संस्था इत्यादी बाबींचा आढावा घेतला आहे.

**श्री गाडगे महाराज मिशनची स्थापना व कार्यविस्तार** या द्वितीय प्रकरणामध्ये श्री गाडगेबाबांचा मिशनच्या स्थापनेपाठीमागील उद्देश, गाडगे महाराज मिशनची प्रत्यक्ष स्थापना, तिची ध्येयधोरणे त्याचबरोबर गाडगे महाराज मिशनच्या कार्य विस्ताराचे प्रमुख टप्पे, त्या टप्प्यांमध्ये झालेला शाखाविस्तार आणि गाडगे महाराज मिशनच्या एकूण कार्याची वैशिष्टये इत्यादी. मुद्दयांचा सविस्तर आढावा घेतला आहे.

**श्री गाडगे महाराज मिशनचे प्रशासन** या तृतीय प्रकरणामध्ये प्रशासन म्हणजे काय? गाडगे महाराज मिशनच्या सुरूवातीच्या कालखंडातील प्रशासनाचे स्वरूप, सन १९७१ च्या मिशनच्या घटनादुरूस्तीनुसार प्रशासनात झालेले बदल, याशिवाय गाडगे महाराज मिशनचे केंद्रीय प्रशासन, स्थानिक प्रशासन, मिशन संचलित शाखा - उपशाखांचे प्रशासन, मिशनचे आर्थिक व्यवहार आणि एकूण प्रशासनाची वैशिष्टये, इत्यादी घटकांची विस्तृत चर्चा करण्यात आली आहे.

**श्री गाडगे महाराज मिशनचे नेतृत्व** या चौथ्या प्रकरणात गाडगे महाराज मिशनच्या नेतृत्वाचे स्वरूप, गाडगे महाराज मिशनचे केंद्रस्तरावर नेतृत्व केलेल्या व्यक्ती दादासाहेब देशमुख, यशवंतराव माने, जिजाबा मोहिते, विश्वनाथ वाघ, राजराम घोंगटे,

तुकाराम खांडवे इत्यादींनी केलेले कार्य तसेच मिशनच्या विकासासाठी राबविलेल्या योजना यांचा संक्षिप्त आढावा घेतला आहे. त्याचबरोबर गाडगे महाराज मिशन संचलित शाखा-उपशाखांचे स्थानिक नेतृत्व, गाडगे महाराज मिशनच्या नेतृत्वाची वैशिष्टये इत्यादी घटकांचा सारांश रूपाने आढावा घेण्यात आला आहे.

**समारोप** या पाचव्या व लघु- शोधप्रबंधाच्या अखेरच्या प्रकरणामध्ये श्री गाडगे महराज व गाडगे महाराज मिशनच्या कार्याचे एकूण संशोधनांती हाती आलेले निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. तसेच गाडगे महाराज मिशनच्या कार्याचा प्रभाव आणि समकालीनांकडून करण्यात आलेले मूल्यमापन याचीही चर्चा सदर प्रकरणात केली आहे.

लघु-शोधप्रबंधाच्या शेवटी संदर्भ साधनाची तपशीलवार सूची दिली आहे.

**राजेंद्र पांडुरंग महानवर**

**(संशोधक)**



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.